**ठळक बातम्या**

- वक्फ सुधारणा विधेयक आज लोकसभेत सादर
- राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून देशभरातल्या टोल आकारणीत ४ ते ५ टक्क्यांची वाढ
- अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या नवीन कर लादण्याच्या घोषणेची अंमलबजावणी आजपासून होणार, अमेरिकेच्या प्रवक्त्यांनी दिली माहिती

**आणि**

- आयपीएल क्रिकेट स्पर्धेत रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरूचा सामना आज गुजरात टायटन्सशी होणार

**<><><><><><>**

केंद्रीय अल्पसंख्याक व्यवहारमंत्री किरेन रिजिजू यांनी आज लोकसभेत वक्फ सुधारणा विधेयक सादर केलं. वक्फ सुधारणा विधेयकाचं उद्दिष्ट वक्फ मालमत्तेचं व्यवस्थापन आणि प्रशासन यात सुधारणा करणं हे आहे. सरकार कोणत्याही धार्मिक स्थळाच्या नियमांत बदल किंवा हस्तक्षेप करणार नाही, हे विधेयक केवळ मालमत्ता व्यवस्थापनाशी निगडित आहे, असं रिजिजू यांनी सांगितलं.

या विधेयकावर विचारविनिमय करण्यासाठी स्थापन केलेल्या संयुक्त संसदीय समितीत यावर व्यापक चर्चा झाली असून आतापर्यंत कोणत्याही विधेयकावर इतकी चर्चा झालेली नाही, असं सांगताना रिजिजू म्हणाले…

**होल्ड.. बाईट - किरेन रिजिजू (38 सेकंद)**

या विधेयकाला विरोध करणारे देखील त्यातल्या सुधारणांचा अभ्यास केल्यानंतर त्याचं स्वागत करतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. मात्र विरोधक

याबाबतीत जनतेची दिशाभूल करत आहेत, असा आरोप त्यांनी केला. या विधेयकातल्या कोणत्याही तरतुदीला आव्हान देता येऊ शकेल. वक्फ बोर्डांमध्ये शिया, सुन्नी, बोहरा तसंच मुस्लिम समाजातल्या मागास जमातींचे प्रतिनिधी आणि महिलांचा देखील समावेश असेल अशी माहिती रिजिजू यांनी दिली. या निर्णयावर कोणालाही विरोध करण्याचं कारण नसावं, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. सरकार कोणाच्याही धार्मिक भावना दुखावत नसल्याचं ते म्हणाले. संपूर्ण जगातल्या वक्फ मालमत्तेपैकी सर्वाधिक मालमत्ता भारतातल्या वक्फ मंडळांच्या ताब्यात आहे, मात्र असं असूनही आजपर्यंत मुस्लिम समाजातले गरीब लोक शिक्षण, वैद्यकीय सुविधा, रोजगार यांपासून का वंचित राहिले, असा प्रश्न त्यांनी व्यक्त केला. या विधेयकाला धर्म आणि जातीच्या कक्षेतून न पाहता त्याकडे मुस्लिम समाजातल्या गरिबांच्या कल्याणाच्या दृष्टीनं बघावं, असं आवाहन त्यांनी केलं. आपल्या देशात कित्येक वक्फ मालमत्ता पडून आहेत, त्यांचा उपयोग गरीब मुस्लिमांसाठी करता येईल, असं ते म्हणाले. जर आपण आज या विधेयकात सुधारणा केल्या नसत्या तर आपण ज्या संसद भवनात बसलो आहोत त्यावरही वक्फ मालमत्ता म्हणून दावा करता आला असता. जर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं सरकार सत्तेत आलं नसतं तर देशाच्या अनेक मालमत्ता रद्द झाल्या असत्या, असं रिजिजू यांनी सांगितलं.

केंद्रीय मंत्रिमंडळानं वक्फ सुधारणा विधेयक संमत केल्यानंतर ते संसदेसमोर मांडण्यात आलं आणि सभागृहाच्या सहमतीनंच ते संयुक्त संसदीय समितीकडे पाठवण्यात आलं होतं. विरोधी पक्षांचा देखील तसाच आग्रह होता, असं केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी लोकसभेत सांगितलं. विरोधी पक्षांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना ते उत्तर देत होते. समितीनं विधेयकात सुचवलेल्या सुधारणांसह केंद्रीय मंत्रिमंडळानं त्याला सहमती दिली असं ते म्हणाले. तर कोणत्याही विधेयकात सुधारणा करण्याचा समितीला संपूर्ण अधिकार असतो असं लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांनी सांगितलं.

<><><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी गरीब मुसलमानांच्या हिताचा विचार करत असून विरोधी पक्षांनी वक्फ सुधारणा विधेयकाच्या मुद्द्याचं राजकारण न करता तर्काच्या आधारे विरोध करावा, असं संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी म्हटलं आहे. विधेयक सादर करण्यापूर्वी नवी दिल्ली इथं संसद परिसरात ते वार्ताहरांशी बोलत होते.

<><><><><><>

जम्मू आणि काश्मीरमध्ये ३ नव्या फौजदारी कायद्यांची संपूर्ण अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी केंद्र सरकारनं समित्या स्थापन केल्या आहेत. केंद्र सरकारनं जम्मू आणि काश्मीरच्या मुख्य सचिवांच्या नेतृत्वाखाली एक सुकाणू समिती आणि पोलीस महासंचालकांच्या नेतृत्वाखाली एक अधिकार प्राप्त समिती स्थापन केली आहे, अशी माहिती केंद्रीय गृह राज्यमंत्री नित्यानंद राय यांनी लोकसभेत एका प्रश्नाच्या लेखी उत्तरात दिली.

<><><><><><>

राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने देशभरातल्या टोलशुल्कात ४ ते ५ टक्क्यांनी वाढ केली आहे. ही वाढ तात्काळ लागू होणार आहे. हलक्या वाहनांसाठी ५ ते १० रुपये तर जड वाहनांसाठी २० ते २५ रुपयांनी टोल वाढणार आहे. कारसाठीचा मासिक पास आता ९३० वरून ९५० रुपये इतका होणार आहे. हे सुधारित दर देशभरातले राष्ट्रीय महामार्ग तसंच एक्सप्रेस मार्गांना लागू होणार आहेत.

<><><><><><>

देशातल्या युवकांनी राष्ट्र प्रथम या भावनेनं काम करावं, असं आवाहन केंद्रीय युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्री मनसुख मांडवीय यांनी केलं आहे. ते आज नवी दिल्लीत आयोजित विकसित भारत युवा संसदेत बोलत होते. भारताला विकसित राष्ट्र बनवण्यात युवकांची भूमिका महत्वपूर्ण असल्याचा पुनरुच्चार त्यांनी केला.

विकसित भारत या संकल्पनेवर आधारित दोन दिवसीय युवा संसदेत देशभरातल्या ३०० जिल्ह्यातले युवक सहभागी झाले आहेत. युवा संसदेतून युवकांना देशाच्या लोकशाहीचं स्वरूप समजून घेता येईल, असं मांडवीय यांनी सांगितलं.

**<><><><><>**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केलेल्या नवीन कर लादण्याच्या घोषणेची अंमलबजावणी आजपासून होणार असल्याचं अमेरिकेच्या अधिकृत सूत्रांनी सांगितलं आहे. व्हाईट हाऊसच्या प्रवक्त्या कॅरोलिन लेविट म्हणाल्या की, ट्रम्प यांच्या घोषणेनुसार अमेरिकन वस्तुंवर कर लावणाऱ्या देशांवर परस्पर कर लागू केले जातील. तर वाहनांच्या आयातीवर २५ टक्के कर उद्यापासून लागू केला जाईल. यामुळे अमेरिकेच्या उत्पादन क्षेत्राला चालना देण्याचा हेतू असून इतर देशांकडून चालणाऱ्या अन्याय्य व्यापारासाठी ही एक प्रकारे शिक्षा ठरणार आहे, असं डोनाल्ड ट्रम्प यांनी या करांविषयी घोषणा करताना म्हटलं होतं.

**<><><><><>**

इस्रायली सैन्य गाझामधल्या लष्करी कारवाईचा विस्तार करून या प्रदेशाचा मोठा भाग ताब्यात घेईल असं इस्रायलचे संरक्षण सचिव इस्रायल कात्झ यांनी म्हटलं आहे. या भागातल्या दहशतवाद्यांचा आणि त्यांच्या पायाभूत सुविधांचा खात्मा करणं हा या विस्तारित लष्करी कारवाईचा उद्देश असल्याचं कात्झ यांनी एका निवेदनात म्हटलं आहे. लष्करानं ताब्यात घेतलेला भाग इस्रायली सुरक्षा क्षेत्रात समाविष्ट केला जाईल. यासाठी मोठया संख्येनं पॅलेस्टाईनी लोकांचं स्थलांतर करावं लागेल, असंही त्यांनी सांगितलं. हमासचा खात्मा करून इस्रायली ओलिसांची सुटका करावी, असं आवाहन करून युद्ध संपवण्याचा मार्ग असल्याचं त्यांनी अधोरेखित केलं.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरूचा सामना आज गुजरात टायटन्सशी होणार आहे. हा सामना बेंगळुरूच्या एम. चिन्नास्वामी स्टेडियमवर संध्याकाळी ७.३० वाजता सुरू होईल.

लखनौ इथं काल रात्री झालेल्या सामन्यात पंजाब किंग्सनं लखनौ सुपर जायंट्स संघाचा ८ गडी राखून पराभव केला. लखनौ सुपर जायंट्स संघानं निर्धारित २० शतकात ७ गडी गमावून १७१ धावा केल्या. पंजाब किंग्सनं अवघ्या २ गड्यांच्या मोबदल्यात १६ षटकं आणि २ चेंडुत हे आव्हान पार केलं. गुणतालिकेत पंजाब किंग्ज चार गुणांसह दुसऱ्या स्थानावर पोहोचला आहे, तर लखनौ दोन गुणांसह सहाव्या स्थानावर आहे.

**<><><><><><>**

अर्जेंटिना इथं उद्यापासून सुरू होणाऱ्या ISSF नेमबाजी विश्वचषक स्पर्धेत भारताचे ४३ खेळाडू सहभागी होत आहेत. या पथकाचं नेतृत्व ऑलिंपिक पदक विजेती मनु भाकर करणार आहे. या स्पर्धेचा उद्घाटन समारंभ आज होणार आहे. या स्पर्धेत एअर रायफल, एअर पिस्तुल आणि शॉटगन प्रकार असून त्या ४५ देशांमधले ४०० हून अधिक नेमबाज सहभागी होत आहेत.

**<><><><><><>**

भारतीय नौदलाच्या आयएनएस तर्कश या लढाऊ जहाजाने पश्चिम हिंद महासागरात अडीच हजार  किलो अंमली पदार्थ जप्त केले. पश्चिम हिंद महासागरात एक जहाज संशयास्पदरित्या आढळल्याची माहिती भारतीय नौदलाच्या  पी ८ आय विमानानं आयएनएस तर्कशला दिली होती. हे जहाज अमली पदार्थ वाहून नेत असल्याचा संशय होता. त्यामुळे आयएनएस तर्कशने आपला मार्ग संशयित जहाजाच्या दिशेने बदलला. या जहाजाची चौकशी करून ते अडवण्यात आलं. जहाजाची तपासणी केल्यानंतर त्यात अमली पदार्थ सापडले.

**//<><><><><><>//**